# घन कचरा व्यवस्थापनाचे नियम पाळता का ?

## उच्च न्यायालयाची पुणे महापालिकेला तंबी

**मुंबई : प्रतिनिधी**

महापालिकांसाठी घन कचरा व्यवस्थापनाबाबत उच्च न्यायालयाने २०१३ मध्ये आखून दिलेल्या मागदर्शक तत्त्वांवर अंमलबजावणी करत आहात का? तसे नसल्यास आम्ही कठोर निर्णय घेऊ, अशी तंबी उच्च न्यायालयाने सोमवारी पुणे महापालिकेला दिली. बांधकाम परवाने देण्यावर स्थगिती आणण्याचाही विचार करू, असा इशारा उच्च न्यायालयाने महापालिकेला दिला आहे.

पुणे महापालिका घन कचरा व्यवस्थापनाच्या नियमांचे उल्लंघन करून कचऱ्याची विल्हेवाट योग्य पद्धतीने लावत नाही. तसेच काही ठिकाणी कचरा टाकण्यासाठी सरकारची परवानगी नसतानाही कचरा टाकण्यात येत असल्याची तक्रार नागरिक चेतना मंचाचे कर्नल जठार यांनी उच्च न्यायालयात याचिकेद्वारे केली आहे. या याचिकेवरील सुनावणी न्या. अभय ओक व न्या. व्ही. एल. अचलिया यांच्या खंडपीठापुढे होती.

सुनावणीवेळी खंडपीठाने २०१३ च्या मार्गदर्शक तत्त्वांवर अंमलबजावणी केली की नाही, याबाबत पुणे महापालिकेचे वकील ॲड. अभिजित कुलकर्णी यांच्याकडे विचारणा केली. मात्र या संदर्भात कोणतेही ठोस उत्तर नसल्याने ॲड. कुलकर्णी यांनी या संदर्भात एका आठवड्यात माहिती देण्याची मुभा खंडपीठाकडे मागितली. मात्र खंडपीठाने त्यास स्पष्ट नकार दिला.

तुम्ही (पुणे महापालिका) उत्तर देईपर्यंत भोगवटा प्रमाणपत्र देणार नाही, अशी हमी आम्हाला द्या, असे खंडपीठाने म्हटले. त्यावर ॲड. कुलकर्णी यांनी यामुळे सामान्यांचेच नुकसान होईल, असे खंडपीठाला सांगितले.

सामान्यांचे नुकसान होईल, असे तुम्हाला वाटते तर तुम्ही नव्या बांधकामांना परवानगीच देऊ नका, असे म्हणत खंडपीठाने पुणे महानगरपालिकेला तंबी दिली.


न

ष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान
क विसारपावती धारक **मोहम्मद उस्मान**
सदर मिळकत आमच्या अशिलांना खरेदी
रक्कम स्वीकारलेली आहे. सदर विद्यमान
भरवसा व खात्रीही दिलेली आहे, तरी
, साठेखत, विसारपावती, चोळी-बांगडी,
हक्क, हितसंबंधासंबंधी अस्सल कागदपत्रे
सांच्या आत दाखवून/लेखी कळवून खात्री
खमी आहे, असे समजून आमचे अशील
तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.
धिकारकक्षेतील **गाव मौजे थेरगाव**, ता.
मधील **क्षेत्र ३०७२ चौ. फूट** मिळकत.
: स.नं. पैकी शिल्लक मिळकत, दक्षिणेस
मिळकत व श्री. पंजाबी यांची मिळकत.
**र. मोहिते, श्री. संतोष बी. ढोकले,**
ी १७, मो. नं. ९८२२०६५३२९

शिष्ठामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे मालक १. श्री.